# पशुसंवर्धन विभाग

## १. सीआर/७१९/गोंदिया/१४

फिर्यादी यांचे वडील माजी सैनिक असून गोरेगांव जिल्हा गोंदिया येथे रहाणारे आहेत. महाराष्ट्र राज्य शासनाच्या नावीन्यपूर्ण राज्यस्तर योजने अंतर्गत कुक्कूटपालनाद्वारे व्यवसाय सुरु करण्यासाठी लाभार्थ्यांना अनुदान देण्यात येते. फिर्यादी यांचे वडीलांचे लाभार्थी यादीमध्ये निवड झाली होती व त्यांना रु.१,६८,७५०/- एवढे रक्कमेचे अनुदान शासनाकडून मंजूर झाले आहे. फिर्यादींचे वडील माजी सैनिक हे वयोवृध्द असल्याने त्यांचे व्यवहार हे फिर्यादी पहात होते. सदर अनुदानाच्या दुसऱ्या धनादेशासाठी मागणी पत्रावर सही करण्याचे अधिकार आरोपी लोकसेवक उत्तम नामदेव नारनवरे, उपायुक्त, जल्हा पशुसंवर्धन, गोंदिया, वर्ग-१ यांना होते. सदर धनादेशाच्या मागणी पत्रावर सही करण्यासाठी आलोसे यांनी रु. ५०००/- लाचेची मागणी फिर्यादी यांचेकडे करुन दिनांक ०८/०८/२०१४ रोजी लाचेची रक्कम पंचासमक्ष स्वीकारताना पकडण्यात आले.

सदरबाबत रामनगर पो.स्टे. ठाणे, जिल्हा गोंदिया गु.र.नं. ३०२६/२०१४ लाप्रका कायदा कलम ७,१३(१) (ड) सह १३(२) लाप्रका १९८८ अन्वये नोंद करण्यात येवून आरोपी लोकसेवक यांना अटक करण्यात आली आहे.

# २.सीआर/१९५/नंदूरबार/२०१५

तक्रारदार यांचा कुक्कुट पालनाचा व्यवसाय आहे. तक्रारदार यांना शासनाकडून कुक्कुट पालनासाठी रु.१,१२,५००/- अनुदान मंजूर झालेले आहे. त्यापैकी त्यांना पहिल्या हप्त्याचा रु.८७,३१५/- धनादेश मिळालेला आहे. दुसऱ्या हप्त्यापोटी उर्वरित रक्कमेचा धनादेश मंजूर होण्यासाठी पंचायत समिती कार्यालयाकडून जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, नंदूरबार यांचेकडे मंजूरीचा प्रस्ताव पाठविण्यासाठी आलोसे डॉ.राजेंद्र गुला पाटील, पशुसंवर्धन अधिकारी, पंचायत समिती, नंदूरबार यांनी तक्रारदार यांचेकडे रु.१५,०००/- लाचेची मागणी केली. त्यावरुन तक्रारदार यांनी अ‍ॅ.क.ब्युरो कार्यालय, नंदूरबार येथे तक्रार दिली. तक्रारदार यांचे तक्रारीवरुन सापळा आयोजित केला असता आलोसे डॉ.राजेंद्र गुला पाटील, पशुसंवर्धन अधिकारी, पंचायत समिती, नंदूरबार यांनी तक्रारदार यांचेकडे दिनांक २५.२.२०१५ रोजी १६.१० वाजता पंचायत समिती कार्यालयाचे आवार, नंदूरबार.येथे रु.१५,०००/- लाचेची मागणी करुन स्विकारले असता त्यांना पकडण्यांत आलेले आहे.

त्याबाबत आलोसेविरुध्द नंदूरबार शहर पोलीस ठाणे गुरनं. ३०११/२०१५, भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा सन १९८८ चे कलम ७,१३(१)(ड,)सह १३(२प्रमाणे प्रमाणे दिनांक २५.२.२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यांत आलेला आहे. आरोपी लोकसेवक यांना अटक करण्यांत आलेली आहे.

## ३. सीआर/220/सोलापूर/15

तक्रारदार हे शेती व कुकुट मासंलपक्षी पालनाचा व्यवसाय करत असून ते बुधवार पेठ, मिलींद नगर सोलापूर येथील राहणारे आहेत. त्यांना राष्ट्रीय कृषि कुकुट विकास योजना सन २०१३ ।२०१४ अंतर्गत १००० मासंलपक्षी गट वाटप योजनेचे अनुदान मिळाले होते.

आलोसे अविनाश रामचंद्र देवळे, पशुधन विकास अधिकारी, पंचायत समिती उत्तर सोलापूर वर्ग १ सोलापूर यांनी सदर राष्ट्रीय कृषि कुकुट विकास (आरकेव्हीवाय) योजनेचा रु.८४,३७५/- रुपयाचा व रु.२८,१२५/- दिलेल्या चेकचा मोबदला म्हणून रु.५,०००/- लाचेची मागणी केली. दि.०२.०३.२०१५ रोजी आलोसे अविनाश रामचंद्र देवळे यांना सदरची लाचेची रक्कम स्वीकारताना रंगेहात पकडण्यात आले. सदर बाबत सदर बझार पोलीस ठाणे भाग ६ गुरनं ३०३५/२०१५ कलम ७, १३, (१) (ड) सह १३ (२) लाप्रकाक १९८८ अन्वये नोंद करण्यात येवून आरोपी लोकसेवक यांना अटक करण्यात आली आहे.